अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 18 जून 2026 | वर्ष 11 वे | अंक 45 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ४० वर्षानंतर आवळगाव देवस्थानचा वाद चव्हाट्यावर

## हयात असलेल्या विश्वस्तांचा ग्रामस्थांच्या 'बेकायदेशीर' मनमानीविरोधात एल्गार

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील ऐतिहासिक व धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान असलेल्या मौजा आवळगाव येथील 'श्री दत्तात्रय राम मंदिर गुरुबाबा देवस्थान त्रिवेणी संगम' (रजि. नं. ए ६१२-सी) चा मागील ४० वर्षांपासूनचा अंतर्गत वाद आता थेट चव्हाट्यावर आला आहे. देवस्थानच्या हयात असलेल्या दोन वयोवृद्ध विश्वस्तांनी स्थानिक काही राजकीय पुढारी आणि ग्रामस्थांच्या मनमानी व



बेकायदेशीर कारभाराविरोधात पत्रकार परिषद घेऊन प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. संस्थेच्या नियमावलीला (बायलॉज) हरताळ फासून गावात समांतर आणि बेकायदेशीर कार्यकारिणीची निवड प्रक्रिया राबवली जात असल्याचा खळबळजनक आरोप विश्वस्तांनी या पत्रकार परिषदेत केला.

पत्रकार परिषदेत माहिती देताना देवस्थानचे अधिकृत विश्वस्त आबाजी धोंडू तिवाडे आणि डोमा गोपाळा झरकर यांनी सांगितले की, देवस्थानच्या बायलॉजप्रमाणे या संस्थेवर एकूण ११ विश्वस्तांची अधिकृत बॉडी आहे. मात्र, काळाच्या ओघात ९ विश्वस्तांचे निधन झाले असून, सध्या केवळ ते दोघेच विश्वस्त हयात आहेत. 'सुमारे ४० वर्षांपूर्वी गावातील काही राजकीय प्रवृत्तीच्या लोकांनी आम्हा विश्वस्तांना धमकावून, वाद घालून देवस्थानचा संपूर्ण आर्थिक व्यवहार जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतला. तेव्हापासून आम्हास कोणत्याही प्रकारची कल्पना न देता किंवा विश्वासात न घेता, दर पाच वर्षांनी गावकरी स्वत:च आमसभा घेऊन बेकायदेशीरपणे कार्यकारिणी निवडत आहेत,' असा आरोप वृद्ध विश्वस्तांनी केला. विशेष म्हणजे, गेल्या ४० वर्षांत या कथित समितीने सहायक धर्मदाय आयुक्तांशी साधा पत्रव्यवहारही केलेला नाही.

वयोवृद्ध असल्यामुळे आणि

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# तरुणीला उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी दिले जीवनदान

## दीड किलोपेक्षा जास्त वजनाची गाठ काढण्यात डॉक्टरांना यश

ब्रह्मपुरी/ महेश पिलारे :

'गरीब असणे हा गुन्हा नाही, पण पैशांअभावी उपचार न मिळणे हा मानवी संवेदनांचा अंत आहे.' अशाच एका कठीण प्रसंगातून जाणाऱ्या नागभीड तालुक्यातील एका २२ वर्षीय तरुणीसाठी ब्रह्मपुरी येथील उपजिल्हा रुग्णालय देवदूत ठरले आहे. रुग्णालयातील वैद्यकीय चमूच्या अथक परिश्रमामुळे आणि संवेदनशीलतेमुळे एका तरुणीच्या अंडाशयातील तब्बल १६२० ग्रॅम वजनाची मोठी गाठ (Ovarian Cyst) यशस्वी शस्त्रक्रिया करून बाहेर काढण्यात आली. या यशस्वी



कामगिरीमुळे केवळ त्या तरुणीला नवीन जीवनदानच मिळाले नाही, तर शासकीय रुग्णालयावरील सर्वसामान्यांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

मिंडाळा (ता. नागभीड, जि. चंद्रपूर) येथील रहिवासी असलेली २२ वर्षीय कु. वेदश्री रामेश्वर बनपूरकर हिला मागील अनेक दिवसांपासून पोटात असह्य वेदना होत होत्या. दिवसेंदिवस हा त्रास वाढत गेल्याने कुटुंबाने तिला खाजगी रुग्णालयात नेले. तिथे तपासणी अंती डॉक्टरांनी 'पोटात मोठी गाठ (गोळा) झाली असून तातडीने शस्त्रक्रिया करावी लागेल' असा सल्ला दिला. मात्र, खाजगी रुग्णालयातील शस्त्रक्रियेचा अवाढव्य खर्च ऐकून आधीच आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या बनपूरकर कुटुंबाच्या पायाखालची जमीनच सरकली. 'मुलीचा जीव कसा वाचवायचा?' या विवंचनेने आणि हताशतेने या कुटुंबाला अंतर्मुख व्हायला लावले होते.

सर्व दरवाजे बंद झालेले असताना, हे कुटुंब हताश न होता उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथे दाखल झाले. रुग्णाची गंभीर अवस्था आणि कुटुंबाची हलाखीची आर्थिक स्थिती पाहून येथील वैद्यकीय अधीक्षकांनी तात्काळ मदतीचा हात पुढे केला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रीतम खंडाळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने या आव्हानात्मक शस्त्रक्रियेची तयारी सुरू केली. १२ जून २०२६ रोजी अत्यंत गुंतागुंतीची ही शस्त्रक्रिया पार पडली. भूलतज्ज्ञ डॉ. ठाकर , सर्जन डॉ. पेशट्टीवार , डॉ. पुष्कर भाई , स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मेघा सावसाकडे , आणि डॉ. रिचा मॅम यांच्यासह नर्सिंग स्टाफ व इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या कौशल्याची पराकाष्ठा केली. डॉक्टरांच्या या चमूला तरुणीच्या अंडाशयातून तब्बल १६२० ग्रॅम म्हणजेच दीड किलोपेक्षा जास्त वजनाची गाठ यशस्वीरित्या बाहेर काढण्यात यश आले.

शस्त्रक्रियेनंतर वेदश्रीच्या वेदना थांबल्या असून तिच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा होत आहे. आपल्या मुलीला सुखरूप पाहून तिच्या आई-वडिलांच्या व नातेवाईकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. 'पैशांअभावी आम्ही आशा सोडली होती, पण ब्रह्मपुरी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी आमच्या मुलीला नवीन आयुष्य दिले,' अशा भावना व्यक्त करत रुग्णाच्या नातेवाईकांनी संपूर्ण वैद्यकीय चमूचे जाहीर आभार मानले आहेत.

ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयात अशा प्रकारची मोठी आणि यशस्वी शस्त्रक्रिया मोफत किंवा अत्यंत अल्प दरात उपलब्ध करून देणे, ही आरोग्य यंत्रणेची संवेदनशीलता दर्शवणारी आहे. ब्रह्मपुरी उपजिल्हा रुग्णालयाच्या या कामगिरीबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून आणि सामाजिक स्तरातून त्यांच्यावर प्रशंसेचा वर्षाव होत आहे.



## संपादकीय...

# एल निनोचे सावट

नैसर्गिक आपत्तींसमोर मानवाचे तंत्रज्ञान आणि बळ अनेकदा कमी पडते तेव्हा मानवाला जाणीव होते की तो निसर्गापेक्षा श्रेष्ठ नाही. आपल्या कथित प्रगतीसाठी मानवाने निसर्गावर निर्दयपणे आक्रमण केल्याचे दुष्परिणाम दिसत आहेत. जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जगातील अनेक देश नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, अतिवृष्टी आणि तापमानवाढ यांसारख्या समस्यांना सामोरे जात असताना प्रशांत महासागरात आता पुन्हा एकदा एल निनो सक्रिय झाल्याच्या बातम्या येत आहेत. हवामानशास्त्रज्ञांच्या मते एल निनोचा प्रभाव केवळ प्रशांत महासागरापुरता मर्यादित नाही तर त्याचे परिणाम आशिया, आफ्रिका, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियासह जगभरातील हवामान व्यवस्थेवर दिसून येतात. भारतासाठी तर एल निनो विशेष चिंतेचा विषय मानला जातो. कारण त्याचा थेट परिणाम मान्सूनवर होण्याची शक्यता असते.

भारताची अर्थव्यवस्था, कृषी व्यवस्था, जलस्रोत, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण जीवनमान मोठ्या प्रमाणात मान्सूनवर अवलंबून असल्याने एल निनो सक्रिय झाल्यास त्याचे परिणाम केवळ हवामानापुरते मर्यादित राहत नाहीत तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही दूरगामी परिणाम घडवू शकतात. एल निनो ही प्रशांत महासागरातील विषुववृत्तीय भागात निर्माण होणारी एक महासागरीय आणि वातावरणीय घटना आहे. सामान्य परिस्थितीत प्रशांत महासागराच्या पश्चिम भागात उबदार पाणी साचलेले असते तर पूर्वेकडील भाग तुलनेने थंड असतो. परंतु एल निनोच्या काळात हे संतुलन बिघडते. पूर्व आणि मध्य प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढत असल्याने जगभरातील वाऱ्यांचे प्रवाह, ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमान यात बदल घडतात. भारतातील नैऋत्य मान्सूनवरही याचा प्रतिकूल परिणाम होतो. इतिहास पाहिला तर भारतातील अनेक दुष्काळी वर्षांचा संबंध एल निनोशी जोडला गेला आहे. एल निनो सक्रिय झाल्यानंतर भारतासमोर सर्वात मोठे संकट म्हणजे कमकुवत मान्सून.

भारतीय शेतीपैकी जवळपास निम्मी शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. मान्सून कमी पडल्यास त्याचा थेट परिणाम कृषी उत्पादनावर होतो. मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्यास अनेक राज्यांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण होऊ शकते. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि गुजरात यांसारख्या राज्यांना विशेष फटका बसण्याची शक्यता असते. ग्रामीण भागातील विहिरी, तलाव आणि धरणांमधील पाणीसाठा घटू शकतो. याशिवाय उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होण्याची शक्यता असते. आधीच वाढत्या तापमानाचा सामना करणाऱ्या भारतात एल निनोमुळे उन्हाळा आणखी कठीण होऊ शकतो. उष्माघात, पाण्याची कमतरता आणि आरोग्याशी संबंधित समस्या वाढू शकतात. कृषी उत्पादन घटल्याने अन्नधान्याचे दर वाढू शकतात. अन्नधान्य महागल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या खर्चात वाढ होते. वीज निर्मितीवरही परिणाम होऊ शकतो. भारतातील अनेक जलविद्युत प्रकल्प धरणांतील पाणीसाठ्यावर अवलंबून आहेत. पाऊस कमी झाल्यास जलविद्युत निर्मिती कमी होऊ शकते. औद्योगिक क्षेत्रालाही पाण्याच्या कमतरतेचा फटका बसू शकतो. ग्रामीण भागात रोजगार कमी झाल्यास शहरांकडे स्थलांतर वाढू शकते. अशा स्थितीत जितके शक्य होतील तितके प्रयत्न करण्यावर भर द्यावयास हवा. झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. हरित क्षेत्र वाढल्यास स्थानिक हवामान संतुलित ठेवण्यास मदत होते. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांनी मिळून जलसंधारण मोहिमा राबवल्या पाहिजेत. एल निनोसारख्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारने दीर्घकालीन आणि तत्काळ अशा दोन्ही स्तरांवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक सिंचन पद्धतींचा प्रसार वाढवला पाहिजे. अन्नधान्याचा पुरेसा साठा निर्माण करून महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने नियोजन केले पाहिजे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहण्याऐवजी विज्ञानाधारित नियोजन, प्रभावी जलव्यवस्थापन, शाश्वत शेती आणि जनसहभाग यांवर भर देणे ही काळाची गरज आहे.


# ब्रम्हपुरीत ४ दिवस एक दिवसाआड पाणीपुरवठा!

## नान्होरी पंप हाऊसमधील गाळ उपसा कामामुळे तात्पुरता बदल

ब्रह्मपुरी/का.प्र.

शहराला मुख्य पाणीपुरवठा करणाऱ्या नान्होरी पंप हाऊस येथील जॅकवेल आणि इंटेकवेल परिसरात साचलेला गाळ उपसण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या तांत्रिक कामामुळे पाणी उपसा करण्याच्या प्रक्रियेवर तात्पुरता परिणाम झाला असून, खबरदारीचा उपाय म्हणून ब्रह्मपुरी नगर परिषदेने शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थापनात महत्त्वाचा बदल केला आहे. त्यानुसार पुढील अंदाजे ४ दिवस शहरात एक दिवसाआड (आलटून-पालटून) पाणीपुरवठा केला जाणार आहे.

नान्होरी येथील जॅकवेल आणि इंटेकवेल भागात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने पाणी



उपसा करताना तांत्रिक अडचणी येत होत्या. भविष्यात शहराचा पाणीपुरवठा सुरळीत राहावा आणि नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे, यासाठी हा साचलेला गाळ काढणे अत्यंत आवश्यक झाले आहे. नगर परिषदेमार्फत हे काम सध्या वेगाने पूर्ण केले जात आहे. पुढील अंदाजे ४ दिवस (काम पूर्ण होईपर्यंत) शहराच्या विविध भागांत एक दिवसाआड पाणी सोडण्यात येईल. पाणी उपसा प्रक्रियेतील संथ गतीमुळे पाण्याचा दाब काही प्रमाणात कमी राहण्याची शक्यता आहे.

'नान्होरी पंप हाऊस येथील गाळ उपसा करण्याचे काम तातडीने पूर्ण केले जात आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरते नियोजन करण्यात आले आहे. या काळात शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या गरजेनुसार पाणी साठवून ठेवावे आणि पाण्याचा अपव्यय टाळून अत्यंत काटकसरीने वापर करावा. तसेच या तात्पुरत्या बदलासाठी ब्रह्मपुरी नगर परिषदेला सहकार्य करावे,' असे आवाहन नगर परिषद प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# भाजपची शहर, युवा, ओबीसी, अनु.जाती मोर्चा कार्यकारिणी जाहीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टी चंद्रपूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष हरीशजी शर्मा यांच्या सहमतीने तसेच माजी आमदार प्रा. अतुलजी देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली








भारतीय जनता पार्टी ब्रम्हपुरी शहराचे अध्यक्ष डॉ. प्रा. सुयोगकुमार वा. बाळबुध्दे यांनी ब्रम्हपुरी शहर भारतीय जनता पार्टी, भारतीय जनता युवा मोर्चा, भारतीय जनता पार्टी ओ.बी.सी. मोर्चा आणि भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा यांच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा केली.

या कार्यकारिणीत विविध क्षेत्रातील युवा, सामाजिक व संघटनात्मक कार्यात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली असून पक्ष संघटना अधिक सक्षम, गतिमान व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. भारतीय जनता पार्टी ब्रम्हपुरी शहरच्या कार्यकारिणीत स्वप्नील अलगदेवे यांची महामंत्रीपदी, दत्ता येरावार व प्रतीक रत्नपारखी यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय जनता युवा मोर्चा ब्रम्हपुरी शहर अध्यक्षपदी अमित रोकडे यांची नियुक्ती करण्यात आली असून रजत थोटे व पंकज माकोडे यांची महामंत्रीपदी निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी ओ.बी.सी. मोर्चा ब्रम्हपुरी शहर अध्यक्षपदी दिलीप जुमडे यांची तर प्रभू अवसरे व संजय बावनकुळे यांची महामंत्री पदी निवड करण्यात आली. भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा ब्रम्हपुरी शहर अध्यक्षपदी प्रकाश लोखंडे तर अंकज कानझोडे व अरुण बनकर यांची नियुक्ती महामंत्री पदी करण्यात आली आहे.

त्याबद्दल ब्रम्हपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा.अतुलजी देशकर, डॉ. प्रा. सुयोगकुमार वा. बाळबुध्दे, मनोज भूपाल, पवन जयस्वाल, प्रा. प्रकाशजी बगमारे, प्रा.कादर शेख, माजी शहर अध्यक्ष फकिराजी कुर्वे, विलास खरवडे, दिपक ऊराडे, माजी न. से. अतुल पाटील, प्रा.संजय लांबे, प्रा.चंद्रकांत विटाळकर, डॉ.प्रा.अशोक सालोटकर, मनोज वठे, अरविंद नंदुरकर, वर्षा चौधरी, साकेतजी भानारकर, रेशमी पेशने, तनय देशकर, विलास विखार यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या लोकहितकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे भारतीय जनता पार्टी परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## विनोदिनी

एका आमदाराने रात्री मुख्यमंत्र्यांना फोन केला. मुख्यमंत्र्यांनी विचारले, 'काय झालं? तुम्ही इतक्या रात्री का फोन केला...?'

आमदार : 'साहेब, ते...थोड्या वेळापूर्वी गृहमंत्री हृदयविकाराच्या झटक्याने वारले... मला त्यांची जागा घ्यायची आहे...'

मुख्यमंत्री (जांभई देत) : 'बघा, जर स्मशानभूमीच्या लोकांना काही अडचण नसेल, तर मलाही काही अडचण नाही...!!' काय करायचं ते करा... मला आता थोडावेळ झोपू द्या....

# महामार्ग बांधकामातील बेजबाबदारपणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## धुळीच्या विळख्यात ब्रम्हपुरीकर!



ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरातील ख्रिस्तानंद चौक ते भुतीनाला दरम्यान सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाने सध्या ब्रह्मपुरीकरांना पुरते हैराण केले आहे. संबंधित कंत्राटदाराच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि बेजबाबदारपणामुळे स्थानिक नागरिक, व्यापारी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, जनतेमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महामार्गाचे काम सुरू असलेल्या परिसरात दिवसभर धुळीचे प्रचंड ढग पाहायला मिळत आहेत. नियमानुसार बांधकाम सुरू असताना धूळ नियंत्रणासाठी नियमितपणे पाण्याची फवारणी करणे कंत्राटदाराला बंधनकारक आहे; मात्र या नियमाला केराची टोपली दाखवली जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या उडणाऱ्या धुळीमुळे परिसरात श्वसनाचे आजार, तीव्र खोकला, डोळ्यांची जळजळ आणि वेगवेगळ्या प्रकारच्या ॲलर्जीच्या समस्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. नागरिकांचे, विशेषतः लहान मुले आणि वृद्धांचे आरोग्य यामुळे धोक्यात आले आहे.

रस्त्याच्या दुरवस्थेचा सर्वात मोठा फटका स्थानिक बाजारपेठेला आणि दुकानदारांना बसत आहे. दुकानांच्या अगदी समोरच मोठे खड्डे, मातीचे ढिगारे आणि बांधकाम साहित्य अस्ताव्यस्त टाकून ठेवण्यात आले आहे. यामुळे ग्राहकांनी या मार्गावरील दुकानांकडे फिरकणे बंद केले असून व्यापाऱ्यांचा व्यवसाय कमालीचा घटला आहे. यातही फूटपाथवर दुकान थाटून दररोज हातावर पोट भरणाऱ्या लहान व्यावसायिकांचा रोजगार तर पूर्णपणे ठप्प झाला आहे. यामुळे अनेक कुटुंबांसमोर आता थेट आर्थिक आणि उदरनिर्वाहाचे संकट उभे ठाकले आहे. बांधकाम परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही ठोस पाऊल उचलण्यात आलेले नाही. अनेक ठिकाणी सुरक्षात्मक बॅरिकेड्स, रात्री चमकणारे इशारा फलक (रिफ्लेक्टर्स) आणि पर्यायी मार्गांची योग्य व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांना जीव मुठीत धरून कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी अंधारामुळे आणि धुळीमुळे समोरचे काहीच दिसत नसल्याने अपघातांचा धोका कमालीचा वाढला आहे.

विकासकामे ही जनतेच्या सुविधेसाठी आणि हितासाठी असतात, यात शंका नाही. मात्र, तीच कामे जर नागरिकांच्या जीवावर उठणार असतील आणि दैनंदिन जगणे असह्य करणार असतील, तर अशा बेजबाबदार विकासाचा काय फायदा? असा संतप्त सवाल आता ब्रह्मपुरीचे नागरिक विचारत आहेत.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने या घटनास्थळाची पाहणी करावी आणि संबंधित कंत्राटदाराला धूळ थांबवण्यासाठी दिवसातून अनेकदा नियमित पाण्याची फवारणी करावी. बांधकाम साहित्य आणि मातीचे ढिगारे रस्त्यावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत करावी. अपघात टाळण्यासाठी तात्काळ दिशादर्शक आणि रात्री दिसणारे सुरक्षा फलक लावावेत. व्यापारी व नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी कामाचे सुयोग्य नियोजन करावे. या गंभीर समस्येकडे संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी तातडीने लक्ष देऊन ब्रह्मपुरीकरांना या धुळीच्या विळख्यातून मुक्त करावे, अन्यथा नागरिकांकडून तीव्र आंदोलनाचा इशारा मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा - ब्रम्हपुरी काँग्रेस

### महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

महावितरणकडून राज्यभर सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेविरोधात ब्रम्हपुरी काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन देण्यात आले. स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

स्मार्ट मीटर प्रणालीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रम, भीती आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रीपेड पद्धतीमुळे शेतकरी, मजूर, लहान व्यावसायिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. रिचार्जची रक्कम संपल्यास वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता असल्याने नागरिकांची गैरसोय होणार असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. तसेच स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढल्याच्या तक्रारी, नेटवर्क समस्या, तांत्रिक बिघाड, चुकीचे रीडिंग आणि डेटा सुरक्षेबाबतचे प्रश्न यामुळे नागरिकांमध्ये अविश्वास निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला. ग्रामीण भागातील नागरिकांना ऑनलाइन व्यवहार व रिचार्ज प्रक्रियेत अडचणी येत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जनतेच्या भावना लक्षात घेऊन स्मार्ट मीटरची सक्ती थांबवून व्यापक जनजागृती करावी, अन्यथा सर्वसामान्यांच्या हितासाठी काँग्रेस पक्षाला लोकशाही मार्गाने आंदोलन उभारावे लागेल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

निवेदन देताना शहर काँग्रेस अध्यक्ष हितेंद्र राऊत, पं.स.माजी सभापती नेताजी मेश्राम, युवक काँग्रेस अध्यक्ष सोनू नाकतोडे, न.प.आरोग्य सभापती मनोज कावळे, नगरसेवक राकेश पडोळे, नगरसेविका सपना बल्लारपुरे, नगरसेविका जयश्री कुथे, नगरसेवक पुष्पाकर बांगरे, नगरसेवक वकार खान, अमीत कन्नाके, प्रा.ज्ञानेश्वर मेश्राम, अतुल राऊत, वामन मिसार, प्रमोद मोटघरे, किशोर राऊत, गाजी पटेल, सरपंच संजय राऊत, सुधीर पंदीलवार, रूपेश बानबले, जगदीश आमले, राममोहन ब्राडीया, सोमेश्वर उपासे, अरुण अलोने, ब्रम्हदेव दिघोरे, सतीश डांगे, रिंकु पठाण, जमशेद सय्यद यांसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपच्या वतीने कोसंबी, भुज, बल्लारपुर येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील कोसंबी, भुज व बल्लारपूर येथील दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून गावाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भारतीय जनता पार्टी तर्फे विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी यावेळी शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रसंगी भाजपा युवा मोर्चा चंद्रपूर जिल्हाध्यक्ष तनय देशकर, भाजपा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वरजी दिवटे तसेच भाजपा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शाल, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कोसंबी येथील हर्षल सोनुले, भुज येथील निलेश अरुण कांबळे, कु. भारती जगदीश झोडे, कु. घनश्याम सुर्तीकार व बल्लारपूर येथील कु. मनस्वी मोरांडे यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी भाजपा नेते माणिक पा. थेरकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अविनाशजी मस्के, बूथ प्रमुख कुमदेव लेनगुरे, बूथ प्रमुख सुधाकर झोडे, बूथ प्रमुख होनाजी मोहुर्ले, तालुका संयोजक धीरज पाल, मच्छिमार आघाडीचे बाळकृष्णजी साखरे, विद्यार्थी संयोजक तेजस दोनाडकर, श्रीकांत ढोरे, केवळराम पाटील ठिकरे, बाजीराव दुमाने, दिगांबर कांबळे, गोपीनाथजी मोरांडे, पांडुरंगजी भोयर, राजीरामजी दिवटे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाढदिवसानिमित्य मजूरांना कॅपचे वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

मनुष्य जन्मा नंतर त्याच वय हे वाढतच जाते . वाढणाऱ्या वर्षाच्या दिवशी त्याचा वाढदिवस साजरा करण्याची प्रथा आहे. पण आजकाल हे वाढदिवस फार मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात , ते एक ईवेंट झालेले आहेत .

परंतु ब्रम्हपुरी येथील राजू भागवत माजी. शिक्षण विस्तार अधिकारी , सामाजिक कार्यकर्ते हे दरवर्षी सामाजिक समरसते च्या जाणीवेतून ते त्यांचा वाढदिवस आगळया वेगळया पध्दतीने साजरा करतात. ते त्यांच्या वाढदिवसाला कधी गरजू लोकांना रेनकोट, छत्री, शाळेतील विद्यार्थ्यांना बूक पेन, दवाखान्यात रूग्णांना फळ वाटप करून करतात. यावर्षी त्यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त एका बांधकाम साईटवर जाऊन तेथील मजुरांना उन्हाचे दिवस पाहता कॅप व मिठाई चे वाटप केले.

या त्यांच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल त्यांच्या मित्रांनी त्यांचे अभिनंदन केले.

# जेम्स बास्केटबॉल अकादमीच्या होम लीग - २ स्पर्धेचा उत्साहात समारोप

ब्रम्हपुरी/का.प्र.

जेम्स बास्केटबॉल अकादमी, ब्रह्मपुरी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या होम लीग-२ बास्केटबॉल स्पर्धेचा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी समारोप झाला. या स्पर्धेत मुलांच्या चार संघांचा तर मुलींच्या तीन संघांचा सहभाग होता. प्रत्येक संघात १२ खेळाडूंचा समावेश करण्यात आला होता.



मुलांच्या गटात टीम बुल्स, टीम ईगल्स, टीम लायन्स आणि टीम पँथर्स या संघांनी सहभाग नोंदविला. साखळी आणि बाद फेरीतील रोमांचक सामन्यांनंतर अंतिम सामना टीम बुल्स आणि टीम ईगल्स यांच्यात झाला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या सामन्यात टीम बुल्सने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ३९-३६ अशा फरकाने विजय मिळवून विजेतेपद पटकाविले. मुलींच्या गटात टीम लायन्स, टीम ईगल्स आणि टीम पँथर्स या संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामन्यात टीम लायन्स आणि टीम ईगल्स यांच्यात रंगतदार लढत झाली. अखेर टीम लायन्सने २९-२७ अशा निसटत्या फरकाने विजय मिळवत विजेतेपदावर आपले नाव कोरले. स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देविदास जगनाडे (अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन), डॉ. प्रशांत झोडे, गोपाल भानारकर संयोजक, क्रीडा संकुल, गोवर्धन दोनाडकर पत्रकार ब्रम्हपुरी, अशोक शेंडे सी. पी. जेम्स, माधव प्रधान साहेब उपस्थित होते. मान्यवरांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना क्रीडा क्षेत्रातील शिस्त, समर्पण आणि सातत्यपूर्ण सरावाचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी भारतीय बास्केटबॉल संघाची विद्यमान राष्ट्रीय खेळाडू नंदिनी प्रधान हिचा तसेच तिच्या आई-वडिलांचा विशेष सत्कार करण्यात आला. नंदिनीच्या राष्ट्रीय स्तरावरील यशाबद्दल उपस्थितांनी तिचे अभिनंदन केले आणि भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुहास काटकमवार, डॉ. नाकाडे, डॉ. मेंढे, डॉ. गेडाम, एपीआय माधुरी गायकवाड, अमोल देवगडे, मुन्ना लाडे, सारंग बनपूरकर आणि शीतल भास्कर यांनी विशेष सहकार्य केले. त्यांच्या योगदानाबद्दल आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली.या स्पर्धेमुळे स्थानिक खेळाडूंना आपली कौशल्ये प्रदर्शित करण्याची संधी मिळाली असून ब्रह्मपुरी परिसरात बास्केटबॉल खेळाच्या विकासाला चालना मिळाल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## ग्रामीण जीवनाचा वेदनामय पट मांडण्यासाठी कविता

## कवी केशव देशमुखांनी मुलाखतीत उलगडले काव्यरंग

ब्रह्मपुरी/का.प्र.



'कोणताही सर्जनशील लेखक आधी कवितेचे बोट धरतो. माझंही तेच झालं, म्हणून मी कवितेकडे वळलो पण माझी कविता नुसती मनोरंजन करणारी नसावी तर माणसाचे दु:ख, वेदना मांडणारी असावी. माझी कविता कुणाचेही अनुकरण करत नाही. मी अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात जन्मलो. यामुळे माझी कविता वेदनेने भरलेली आहे. खेडयातील उलथापालथ, बदलेले खेडे आणि शेतकऱ्यांची बोरोमास होणारी होरपळ त्यात आहे. एकंदरीत ग्रामीण जीवनाचा वेदनामय पट मांडण्यासाठी मी कवितेचे बोट धरलो ' असे काव्यमय विचार ज्येष्ठ कवी डॉ केशव सखाराम देशमुखांनी मांडले.

मराठीतील ज्येष्ठ कवी, विचारवंत व शेतीमातीशी नाळ जुडवून ठेवणारे बोलीचे भाष्यकार म्हणून डॉ केशव सखाराम देशमुखांची उभ्या महाराष्ट्राला ओळख आहे. नुकतेच ते ब्रह्मपुरी परिसरात पुणेवरुन खास भेटीसाठी आलेत. या निमित्ताने कवी डॉ धनराज खानोरकर व प्रा उपेंद्र चिटमलवारांनी त्यांना बोलते केले.

विचारलेल्या विविध प्रश्नांना डॉ देशमुखांनी हसतमुख उत्तर देत मुलखत रंगविली. यावेळी एक कवी दुसऱ्या कवीला भेटण्याचा आनंदही झाला. कवी खानोरकरांच्या 'मास्तर मातीचे ' काव्यसंग्रहाला डॉ देशमुखांची दीर्घ प्रस्तावना आहे, याचीही आठवण यानिमित्ताने झाली. शेती व ग्रामीण जीवनाशी अतूट नाते असणारे कवी डॉ देशमुखांनी पूर्व विदर्भातील वनसंपदेवरही भाष्य केले. संचालन व आभार प्रदर्शन प्रा गणेश नवघडेंनी केले.

## भाजपा महिला आघाडीतर्फे नंदिनी प्रधानचा सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

पुदुचेरी येथे आयोजित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून ब्रम्हपुरी शहराचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविणाऱ्या कु. नंदिनी माधव प्रधान हिचा भारतीय जनता पार्टी महिला आघाडी, ब्रम्हपुरी शहराच्या वतीने शाल व वृक्षरोप देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी नंदिनीच्या यशाबद्दल तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नंदिनीने आपल्या मेहनत, जिद्द व चिकाटीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक प्राप्त करून ब्रम्हपुरी शहराचा गौरव वाढविला असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या सत्कार समारंभास भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या वर्षा चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष रश्मीताई पेशने, शहर सचिव वर्षा जोशी, उपाध्यक्ष चेतना येवले व रेखाताई कवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माहिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी नंदिनीस पुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा देत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. ब्रम्हपुरीसह संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यासाठी नंदिनीचे यश प्रेरणादायी असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## से.नि. पोलीस कर्मचाऱ्याला जीवे मारण्याची धमकी

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील मौजा आवळगांव येथील सामाजिक कार्यकर्ते व स्वेच्छानिवृत्त पोलीस कर्मचारी केशवजी गोविंदराव बानबले यांना एका कौटुंबिक वादात पीडित महिलेला मदत केल्यामुळे जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बानबले यांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे .

तीस वर्षे पोलीस विभागात सेवा दिल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेऊन केशवजी बानबले हे आवळगांव येथे सामाजिक व समुपदेशनाचे कार्य करतात. दोन वर्षांपूर्वी गावातील एका अन्यायग्रस्त विधवा महिलेला तिच्या चुलत दिराने (गणेश झरकर) अश्लील शिवीगाळ व मारहाण केली होती. घाबरलेल्या पीडित महिलेच्या विनंतीवरून बानबले यांनी तिला पोलीस स्टेशनला नेऊन तक्रार दाखल करण्यास मदत केली होती. यावरून गणेश झरकर याच्यावर गुन्हा नोंद झाला होता. आरोपी गणेश झरकर हा केशवजी बानबले यांचा नातेवाईक (मेव्हणा) आहे. पीडितेला मदत केल्यामुळे त्याचा बानबले यांच्यावर तीव्र राग होता. गावातील लोकांमध्ये तसेच बानबले यांच्या व्हॉट्सॲपवर धमकीवजा संदेश पाठवून त्याने दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बानबले घरी नसताना त्यांच्या पत्नीलाही घरी जाऊन अप्रत्यक्षपणे जीवे मारण्याची धमकी दिली आणि आर्थिक नुकसान करण्याचा प्रयत्न केला.

या गंभीर धमकीनंतर श्री केशवजी बानबले यांनी व्हॉट्सॲप चॅटच्या स्क्रीनशॉट पुराव्यांसह ११ मे २०२६ रोजी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली होती. मात्र, पोलिसांनी १५ दिवसांनंतर म्हणजेच २४ मे २०२६ रोजी केवळ अदखलपात्र (NC) गुन्ह्याची नोंद केली. पोलिसांच्या या ढिसाळ आणि असंवेदनशील कारभारावर बानबले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## रस्ता बांधणीबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर परिषद अंर्तगत प्रभाग क्र. ५ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते तहसील कार्यालय मागील जुने गोडाऊन पर्यंतच्या रस्ता आधीपासूनच उपलब्ध आहे. परंतु तहसील कार्यालया मागील जुने गोडाऊन इथून वडसा रोड पर्यंतचा रस्ता उपलब्ध नसल्यामुळे परिसरातील नागरिक व वाहनधारकांना मोठा फेरा मारुन छत्रपती शिवाजी महाराज चौक किंवा झाशी राणी चौक मार्ग जावे लागते.

या परिसरातील अनेक नागरिक, विद्यार्थी, व्यापारी तसेच वाहनधारकांना ये-जा करावी लागते. जर तहसील कार्यालया मागील जुने गोडाऊन ते वडसा रोड या दरम्यान सुमारे १५० ते २००फुट रस्ता बांधण्यात आला तर वडसा रोडवरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. तसेच नागरिकांना व वाहनधारकांना सरळ व सोईस्कर मार्ग उपलब्ध होईल व त्यांना अनावश्यक फेरा मारावा लागणार नाही. हा रस्ता बांधल्यास स्थानिक नागरिकांसह परिसरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा फायदा होईल. रस्ता तातडीने बांधून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी या बाबतचे निवेदन न. प. मुख्याधिकारी यांना भाजपा शहर महामंत्री पवन जयस्वाल यांनी नुकतेच दिले.

# महाराष्ट्रातील बोलीजागर उपक्रमाचे ८० दिवस पूर्ण

## झाडीबोली ब्रम्हपुरी शाखेचे ४० विशेष उपक्रम यशस्वी

ब्रह्मपुरी/का.प्र.

झाडीबोली साहित्य मंडळ, ब्रह्मपुरीच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या '९० दिवस – ९० उपक्रम' या अभिनव उपक्रमाने यशस्वीपणे ८० दिवसांचा टप्पा पूर्ण केला आहे. प्रत्येक उपक्रमासाठी दोन दिवसांचा कालावधी देण्यात आल्याने आतापर्यंत ४० उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांवर आधारित साहित्याचे विविध प्रकार सादर करण्यात आले. यामध्ये झाडीबोली, पोवारी, अहिराणी, व्हाडी, कोल्हापुरी, गोंडी, खानदेशी, कोकणी, मालवणी, सोलापुरी आदी बोलीभाषांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील बोलीभाषा जाणकार साहित्यिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून दर्जेदार लेखन यात सादर केले आहे.

दिवसेंदिवस लोप पावत चाललेल्या आणि शेकडो वर्षांपासून प्रामुख्याने मौखिक परंपरेत जपल्या गेलेल्या बोलीभाषांचे संवर्धन करणे तसेच त्यांना लेखी स्वरूपात जतन करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून बोलीभाषांचा समृद्ध वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. याबाबत माहिती देताना झाडीबोली साहित्य मंडळाचे अध्यक्ष व उपक्रमाचे आयोजक संतोष मेश्राम यांनी सांगितले की, या उपक्रमातून संकलित झालेल्या साहित्याचे संपादन करून लवकरच बोली साहित्याचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात येणार आहे.

या विशेष उपक्रमासाठी ३३ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कवी प्रा.डॉ. धनराज खानोरकर यांचे मार्गदर्शन लाभत असून, जिल्हाध्यक्ष अरुण झगडकर (चंद्रपूर), मंडळाचे सचिव धनंजय पोटे तसेच संचालिका किरण चौधरी, योगिता निपाने, वृषाली चोरे, ज्योत्स्ना बन्सोड आणि गायत्री गुरव यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. बोलीभाषांच्या जतन व संवर्धनासाठी राबविण्यात येत असलेला हा उपक्रम साहित्य क्षेत्रात विशेष दखलपात्र ठरत असून, महाराष्ट्राच्या भाषिक वैविध्याचे जतन करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत राहील.

**जल है तो कल है...**

# राकेश अहुजा यांना 'यंग रिसर्चर' पुरस्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मुंबई येथे तरुण भारत व महा MTB तर्फे आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात वन्यजीव संघर्ष व्यवस्थापन आणि वन्यजीव संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जीवशास्त्रज्ञ राकेश आहुजा यांना प्रतिष्ठेचा 'यंग रिसर्चर' पुरस्कार प्रदान करण्यात आला.



राकेश आहुजा हे चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी वन विभागात गेल्या ७ वर्षा पासून कार्यरत असून हा परिसर मानव-वन्यजीव संघर्षासाठी देशातील संवेदनशील क्षेत्रांपैकी एक म्हणून ओळखला जातो. वाघ, बिबट आणि इतर वन्यप्राण्यांमुळे उद्भवणाऱ्या संघर्षाच्या घटनांमध्ये त्यांनी प्रभावी व्यवस्थापन करून अनेक नागरिकांचे तसेच वन्यप्राण्यांचे प्राण वाचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राकेश यांची सूक्ष्म निरीक्षण क्षमता, वन्यजीवांच्या वर्तनाचा सखोल अभ्यास, निर्णयक्षमता आणि समस्यांचे प्रभावी निराकरण करण्याचे कौशल्य यामुळे वन विभागाला संघर्ष व्यवस्थापनात मोठे यश मिळाले आहे. त्यांनी स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करून मानव-वन्यजीव सहअस्तित्वाला चालना दिली आहे.

त्यांना मिळालेल्या गौरवा बद्दल चंद्रपूर वन वृत्तचे मुख्य वनसंरक्षक रामानुजन, ब्रम्हपुरी वन विभागाचे उपवनसंरक्षक कुमारस्वामी, डॉ. रविकांत खोब्रागडे, अजय मराठे बचाव दल ताडोबा, सहा. वनसंरक्षक अरविंद जे (IFS), सहा. उपवनसंरक्षक महेश गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे. मुंबई येथे झालेल्या या गौरवामुळे चंद्रपूर जिल्हासह ब्रम्हपुरी वन विभागाच्या कार्यालाही राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याची भावना वन्यजीव प्रेमी आणि वन अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# युवक काँग्रेसच्या मजबूतीसाठी कार्यकर्त्यांनी गावा-गावात पोहचावे - सोनु नाकतोडे

ब्रम्हपुरी/का.प्र.

'युवक काँग्रेस ही सामान्य युवकांच्या हक्कासाठी लढणारी संघटना असून बेरोजगारी, शिक्षण, शेतकरी आणि युवकांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करत आहे. त्यामुळे संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने गावागावात जाऊन युवकांना काँग्रेस पक्षाच्या विचारांशी जोडण्याचे काम करावे', असे आवाहन ब्रम्हपुरी विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष सोनू नाकतोडे यांनी केले.

ब्रम्हपुरी विधानसभा युवक काँग्रेसच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी युवक काँग्रेस प्रदेश महासचिव केतन रेवतकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे, युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष सोनू नाकतोडे, युवक काँग्रेस सिंदेवाही तालुकाध्यक्ष अभिजीत मुप्पीडवार यांसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

सोनू नाकतोडे पुढे म्हणाले की, आज देशातील युवक बेरोजगारी, महागाई आणि शिक्षणाच्या समस्यांनी त्रस्त आहे. या प्रश्नांवर युवक काँग्रेस सातत्याने आवाज उठवत असून युवकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करत आहे. प्रत्येक गावात युवक काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविणे ही काळाची गरज आहे. युवकांनी समाजातील प्रश्न समजून घेत लोकांशी थेट संवाद साधावा.

युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्हा प्रभारी केतन रेवतकर यांनी प्रत्येक बूथ व गावपातळीवर युवक काँग्रेस मजबूत करण्याचे आवाहन केले. बैठकीचे सुत्रसंचलन राहुल मैंद यांनी केले. तर आभार प्रदर्शन इंजि.अक्षय पेटकुले यांनी मानले. बैठकीला युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध गावांतील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

❀❀❀❀❀❀

### ... QUOTES ...

"Please don't be confused between my personality and my attitude, becouse my personality is who I'm, and my attitude depends upon who are you." - AKC Motivation

### चारोळी

रंगीबेरंगी कपडे एकत्र धुऊ नये
कपडे आपसात रंग बदलतात...
रंग बदललेले कपडे घालून ते,
फॅशन शोमध्ये रंग उधळतात...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# मोफत डोळे तपासणी शिबीर व नेत्रदान मार्गदर्शन संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

ज्ञानदीप प्रशासकीय महाविद्यालय, चौगानच्या वतीने जागतिक नेत्रदान दिनानिमित्त मोफत डोळे तपासणी शिबीर व मरणोत्तर नेत्रदान विषयक जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास परिसरातील नागरिक, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरामध्ये डॉ. रामटेके नेत्र चिकित्सक अधिकारी, गोनशेटवार साहेब औषधी निर्माता अधिकारी प्रा. आ. केंद्र चौगान, दोनाडकर साहेब MPW चौगान, निहाटे सर, प्रधान मॅडम, मैंद मॅडम उपस्थित होते. सहभागींच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच डोळ्यांचे आरोग्य जपण्यासाठी आवश्यक उपाययोजना, नियमित तपासणीचे महत्त्व आणि विविध नेत्रविकारांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रसंगी मरणोत्तर नेत्र दान करणार याबाबत शपथ घेण्यात आली. यावेळी मरणोत्तर नेत्रदानाचे महत्त्व, नेत्रदानाची प्रक्रिया, त्याबाबत असलेल्या गैरसमजुती आणि नेत्रदानामुळे अंध व्यक्तींना मिळणारे नवे जीवन याविषयी उपस्थितांना माहिती देण्यात आली. अनेकांनी नेत्रदानाचा संकल्प करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारीवृंद तसेच सहकार्य करणाऱ्या डॉक्टरांचे विशेष योगदान लाभले. समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करून अंधत्व निर्मूलनासाठी हातभार लावण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करून भविष्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजनाची अपेक्षा व्यक्त केली.

# ६० वर्षाच्या दीर्घ काळानंतर एकत्र आले वर्गमित्र

## नेवजाबाई हितकारिणी शाळेत रंगला भावनिक स्नेहमीलन सोहळा



ब्रह्मपुरी/का.प्र.

काळ बदलला, वयाची वर्षे वाढली, पण ६० वर्षांपूर्वी शाळेच्या बाकावर सुरू झालेली मैत्री आजही तितकीच घट्ट आहे, याचा प्रत्यय नुकताच ब्रह्मपुरी येथे आला. स्थानिक नेवजाबाई हितकारिणी हायस्कूलच्या १९६७ मधील एस.एस.सी. विज्ञान शाखेच्या माजी विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व स्नेहमीलन सोहळा शालेय परिसरात अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात संपन्न झाला. ६० वर्षांनंतर जेव्हा हे वयोवृद्ध मित्र एकमेकांना भेटले, तेव्हा एकमेकांची गळाभेट घेताना त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू तराळले.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला ने.हि. शिक्षण संस्थेचे पदाधिकारी प्रा. सुभाष बजाज यांच्या हस्ते माता नेवजाबाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दीपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आयोजन ब्रह्मपुरी येथील डॉ. प्रेमलाल मेश्राम यांनी केले. त्यांनी या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विशद केला. प्रास्ताविक करताना त्यांनी सांगितले की, 'आमच्या वर्गात एकूण ५९ विद्यार्थी होते. काळाच्या ओघात त्यापैकी बहुतांश मित्र आपल्याला सोडून मृत पावले आहेत. शोध घेता केवळ १३ विद्यार्थ्यांचे पत्ते मिळू शकले, ज्यांना या कार्यक्रमाची माहिती देण्यात आली.' अत्यंत संवेदनशील पाऊल उचलत, मृत पावलेल्या वर्गमित्रांच्या विधवा भगिनींनाही या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते. उपस्थित राहिलेल्या भगिनींचे यावेळी आदरपूर्वक स्वागत करण्यात आले. या स्नेहमीलनात विविध क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी केलेले माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये तेजराम गजपुरे (वडसा), डॉ. शामराव वालदे (विहीरगाव), प्रा. एल. सी. माटे (सेवानिवृत्त प्राचार्य, इटखेडा), प्रा. पांडुरंग खेवले (नागपूर), इंजिनीअर एस. डी. महाजन (मुंबई), डॉ. राजेंद्र कांबळे (सेवानिवृत्त प्राचार्य, शासकीय महाविद्यालय, नागपूर) या सर्वांनी आपले मनोगत व्यक्त करताना शालेय जीवनातील सुवर्णकाळाला उजाळा दिला. याप्रसंगी वर्गमित्र नानाजी शेंडे (कुर्झा) आणि पंढरी गभणे (सोदरी) हे देखील प्रामुख्याने उपस्थित होते. जुन्या आठवणी सांगताना डॉ. प्रेमलाल मेश्राम यांनी सांगितले की, 'आम्हाला गणित शिकवणारे गजघाटे सर सध्या पुण्यात वास्तव्यास असल्याने वयोमानानुसार येऊ शकले नाहीत, पण त्यांची उणीव सर्वांना भासली.'


या ऐतिहासिक भेटीचे सातत्य राखण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी एक महत्त्वपूर्ण संकल्प केला. यापुढे दरवर्षी २६ जानेवारीला दुपारी ठीक १२:०० वाजता सर्व वर्गमित्रांनी आपल्या याच शाळेत एकत्र यायचे, असे ठरविण्यात आले. तसेच ज्यांना इतर मित्रांचे पत्ते किंवा मोबाईल नंबर मिळतील, त्यांनी त्यांना पुढील कार्यक्रमात सन्मानाने आमंत्रित करावे, असे आवाहनही करण्यात आले.

संस्थेचे पदाधिकारी प्रा. सुभाष बजाज यांनी माजी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना म्हटले की, '६० वर्षांनंतर हे वर्गमित्र एकत्र आले, याचा संस्थेला सार्थ अभिमान आहे. या वर्गातील अनेक विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनीअर, प्राचार्य अशा मोठ्या हुद्द्यांवर काम करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.' तसेच त्यांनी डॉ. प्रेमलाल मेश्राम यांच्या ब्रह्मपुरी परिसरातील समाजकार्याचा विशेष गौरव केला व सर्व माजी विद्यार्थ्यांना सुखी, आनंदी आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अनंतकुमार मेश्राम, अनिल कांबळे, सत्यवान राऊत, प्राचार्य यशवंत मेश्राम, डॉ. विलास मैद, चिरंजीव आसनिक, विलास मेश्राम, होमराज शंभरकर, प्रा. लीना मेश्राम आणि विवेक मेश्राम यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे (भोजनदान) आयोजन करण्यात आले होते. भोजनास्वाद घेतल्यानंतर, पुढील वर्षी पुन्हा भेटण्याच्या वचनासह या अभूतपूर्व सोहळ्याची सांगता झाली.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# ४० वर्षनंतर आवळगाव देवस्थानचा वाद...

(पान क्र. ९ वरून)

गावगुंडांच्या धमक्यांमुळे आजवर हे दोन्ही विश्वस्त शांत होते. मात्र, नुकतीच एका जागरूक व तत्त्वज्ञानी व्यक्तीने त्यांना कायद्याची योग्य बाजू समजावून सांगितली. धर्मदाय आयुक्तांच्या निर्देशानुसार नोंदणीकृत संस्था चालते आणि आमसभा घेण्याचा किंवा निवडीचा अधिकार फक्त मूळ अधिकृत विश्वस्तांनाच असतो, हे समजताच या दोन्ही वृद्ध विश्वस्तांच्या मनातील भीती नाहीशी झाली आणि त्यांनी अन्यायाविरोधात उभे राहण्याचे ठरवले.

कायद्याची बाजू समजल्यानंतर, अधिकृत विश्वस्तांनी दिनांक २०/०४/२०२६ रोजी अजेंड्यासह गावात जाहीर नोटीस लावली होती. यामध्ये देवस्थानच्या शेतजमिनीचा भाडेतत्त्वावर लिलाव करणे आणि मागील ५ वर्षांच्या जमा-खर्चाचा हिशोब जनतेसमोर वाचून दाखवणे, असे मुख्य विषय होते. परंतु, लिलावाच्या दिवशी गावातील काही विशिष्ट राजकीय लोकांनी आपल्या समर्थकांना हाताशी धरून तिथे प्रचंड आरडाओरडा केला आणि लिलाव प्रक्रिया हाणून पाडली. एवढेच नव्हे तर, अजेंड्यावर विषय नसताना आणि कोणताही कायदेशीर अधिकार नसताना, हुकूमशाही पद्धतीने स्वतःच एका रजिस्टरवर ठराव लिहून 'बेकायदेशीर नवीन कार्यकारिणी' घोषित केली व तसा फलकही देवस्थान परिसरात लावला.

या संपूर्ण बेकायदेशीर आणि दडपशाहीच्या प्रकाराबाबत विश्वस्तांनी प्रशासकीय यंत्रणेकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने, अखेर जनतेचे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी ब्रह्मपुरी तालुका पत्रकार संघाच्या माध्यमातून ही पत्रकार परिषद घेण्यात आली. 'नोंदणीकृत देवस्थान हे संपूर्ण विश्वाचे असते, त्यावर कोणा एका गावाची किंवा काही राजकारण्यांची मक्तेदारी चालणार नाही. आबाजी तिवाडे व डोमा झरकर यांनी सदर बाब उघडकीय आणली. आता या गंभीर आरोपानंतर धर्मदाय आयुक्त कार्यालय आणि स्थानिक प्रशासन आवळगाव देवस्थानच्या या ४० वर्षांच्या वादावर काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404